# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी,

## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**७3) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १२.१२.२०२५**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०६/१२/२०२५ ते १२/१२/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१३/१२/२०२५ ते १७/१२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | दिनांक | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २८.३ | २७.५ | २९.० | २९.० | २९.८ | २९.० | २९.६ | कमाल तापमान (अं.से.) | २९ | २९ | ३० | ३० | ३० |
| १६.० | १५.५ | १४.० | १३.४ | १५.९ | १०.४ | ९.१ | किमान तापमान (अं.से.) | ९ | १० | ११ | ११ | १२ |
| अ: ढगाळ | अ: ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| ७२ | ६५ | ६९ | ५० | ५२ | ५९ | ७० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६४ | ६६ | ६४ | ६७ |
| ४४ | ४१ | ४४ | ४५ | २९ | २९ | ३० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २९ | २९ | ३० | ३१ | ३१ |
| ८.४ | ६.८ | ४.४ | ६.४ | ८.३ | ५.९ | ३.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ७ | ८ | ८ | ९ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात हवामान थंड राहील. आकाश पुढील पाच दिवस निरभ्र राहील. तसेच कमाल तापमान २९-३० डिग्री सें. व किमान तापमान ९-१२ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ६-९ कि. मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता / इशारा:** | | **कृषी क्षेत्रावरील प्रभाव आधारित अंदाज (IBF) आणि इशारा लक्षात दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी नाशिक जिल्हा तसेच जिल्ह्यातील घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी (येलो अलर्ट) थंडीच्या लाटेची शक्यता आहे. (१२.१२.२०२५ रोजी आरएमसी मुंबईव्दारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित).** |
| **सामान्य सल्ला** | | वेलवर्गीय भाजीपाला पिके<br>पाणी व्यवस्थापन<br>वेलवर्गीय भाजीपाला पिके जरी पाण्याचा ताण सहन करु शकत असली तरी किफायतशीर उत्पादन मिळविण्याकरिता वेलवर्गीय भाजीपाला पिकांना पाण्याचे व्यवस्थापन करताना वातावरणातील तापमान, जमिनीचा मगदूर आणि पिकाची अवस्था यानुसार पाणी द्यावे. शक्यतो सहा ते आठ दिवसांनी पिकाला पाणी द्यावे.<br>शक्य असल्यास ठिबक सिंचन पध्दतीने पिकाला पाणी द्यावे. प्रती दिवस १ तास संच चालू ठेवावा.<br>पिकाची वाढीची अवस्था, फुलधारणा, फळधारणा या संवेदनशील अवस्थेत कोणत्याही परिस्थितीत पाण्याचा ताण पडू देऊ नये. अन्यथा वाढीवर, फळ पोसण्यावर परिणाम होतो आणि उत्पादनामध्ये घट येते. |
| **संदेश** | | **किमान तापमानाचा अंदाज लक्ष्यात घेता, रात्रीच्या वेळी थंडी वाढत असल्याने छोटी करडे, कुक्कुटपालनात, शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन पिल्ले गरम ठेवा.** |
| **रब्बी ज्वारी** | **उगवण ते वाढीची अवस्था** | डिसेंबर महिन्यात १५ अंश से. च्या खाली तापमान गेल्यास मावा किडीचे प्रमाण वाढते. त्यामुळे चिकटा रोगाचा प्रादुर्भाव होतो. त्यासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथोएट ५०० मिली ५०० लीटर पाण्यातून फवारावे. पाण्याच्या उपलब्धतेनुसार तिसरे पाणी द्यावे व पक्ष्यांपासून संरक्षण करावे. |
| **रब्बी मका** | **उगवण ते वाढीची अवस्था** | रब्बी मका पिकास नत्र खताचा उर्वरित दुसरा हप्ता (युरिया १६ किलो ) पेरणीनंतर ३० दिवसांनी व तिसरा हप्ता (युरिया १६ किलो ) पेरणीनंतर ४०-४५ दिवसांनी द्यावा. |
| **गहू** | **पेरणी** | बागायती उशिरा पेरणी<br>बागायती गव्हाच्या वेळेवर पेरणीसाठी नोव्हेंबर महिन्याचा पहिला पंधरवडा ही शिफारस असली, तरी ऊस तोडणीनंतर, तसेच खरीप पिकांच्या काढणीस उशीर होण्याने गहू पिकाची लागवड उशिरा करावी लागते. बागायत गव्हाच्या उशिरा पेरणीची शिफारस ही १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीसाठी आहे. मात्र, काही ठिकाणी १५ डिसेंबरनंतरही गव्हाची पेरणी केली जाते. वास्तविक १५ नोव्हेंबरनंतर पेरणी केलेल्या प्रत्येक उशिराच्या पंधरवड्यात गव्हाची पेरणी केल्याने एकरी १ क्विंटल उत्पादन कमी मिळते. गव्हाच्या बागायती उशिरा पेरणीसाठी एनआयएडब्लू-३४, एकेएडब्लू-४६२७, फुले समाधान (एनआयएडब्लू-१९९४) या जातींची निवड करावी. एकरी ५० ते ६० किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम कॅप्टन किंवा थायरमची प्रक्रिया करावी. त्यानंतर १५ मिनिटांनी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५० ग्रॅम पीएसबी जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. बागायती उशिरा पेरणीसाठी दोन ओळीत १८ सेंमी अंतर ठेऊन रासायनिक खतांच्या पहिल्या हप्त्यासह दोन चाड्याच्या पाभरीने पेरणी करावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. पेरणी दक्षिणोत्तर करावी. गव्हाची पेरणी उभी-आडवी न करता, एकेरी करावी. म्हणजे आंतरमशागत करणे सोपे जाते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा, म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद आणि ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **हरभरा** | **आंतरमशागत** | हरभरा सारख्या संवेदनशील पिकांचे दंव प्रादुर्भावापासून संरक्षण करण्यासाठी, सल्फ्यूरिक ॲसिड @ 0.1% (1 लिटर $H_2SO_4$ 1000 लिटर पाण्यात) किंवा थायोरिया @ 500 पीपीएम (500 ग्रॅम थायोरिया 1000 लिटर पाण्यात मिसळून) फवारणी करा.<br>थंडीपासून हरभरा पिकाचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार पाणी / तुषार सिंचन च्या सहाय्याने द्यावे. |
| **बागायती हरभरा** | **पेरणी** | हरभरा लागवड उशिरात उशिरा १५ डिसेंबर पर्यंतच्या काळात पेरणी करुन घ्यावी. पेरणीसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने शिफारशीत केलेल्या वाणास प्राधान्य द्यावे.<br>पेरणी करण्यापूर्वी बीजप्रक्रिया करणे फार आवश्यक असून त्यासाठी ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे जेणेकरून संभाव्य बुरशीजन्य रोगापासून संरक्षण मिळेल. |
| **खरीप भात** | **कापणी/ मळणी** | भाताचे खोडकिडीपासून संरक्षण करण्यासाठी भाताची कापणी होताच नांगरट करून चोथे जाळावेत.<br>कापणीच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या भात पिकास यंत्राच्या सहाय्याने कापणी केल्यास वेळेत व खर्चातही बचत होऊ शकते. कापलेला भात वाळण्यासाठी १-२ दिवस पसरून ठेवावा व नंतर मळणी करावी. चांगला उतारा मिळण्यासाठी मळणीयंत्र वापरावे. दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के होईपर्यंत भात वाळवावा. नंतर वाळवून कोरड्या, स्वच्छ व सुरक्षित जागी धान्याची साठवण करावी. |
| **खरीप नाचणी व वरई** | **कापणी / मळणी / साठवणूक** | हवामानाच अंदाज लक्ष्यात घेता पिक पक्व होताच लवकरात लवकर काढणी करावी. पिकांची काढणी कणसे खुडून किंवा जमिनीबरोबर कापणी करावी. कणसे चांगली वाळल्यानंतर कणसे बडवून मळणी करावी. धान्य स्वच्छ करून उन्हात चांगले वाळवून हवेशीर जागी साठवण करावी. |
| **खुरासणी** | **कापणी / मळणी** | परिपक्व झालेल्या ( पिकाची पाने व बोंडे पूर्ण सुकलेले किंवा काही वेळातच पिवळ्या फुलांच्या पाकळ्या कोमेजून डोक्यावरून गळून पडतात) खुरासणी पिकाची कापणी करावी. कापणी केलेल्या पिकांना उन्हात चांगले वाळवून मगच मळणी करावी. |
| **द्राक्षे** | | <u>पिंक बेरी</u><br>जर दिवसाचे तापमान ३५ अंशांपर्यंत वाढलेले आणि रात्रीचे तापमान ७ ते ८ अंशांपर्यंत उतरले असल्यास तापमानातील तफावतीमुळे हिरव्या रंगाच्या द्राक्ष जातींमध्ये हिरव्या रंगद्रव्यांचे रूपांतर गुलाबी रंगद्रव्यामध्ये होते. अशा प्रकारची तापमानातील तफावत एका रात्रीमध्ये बागेतील पूर्ण घड गुलाबी करू शकते.<br>द्राक्षमण्याचा जितका भाग किमान तापमानाच्या सान्निध्यात आला, तितके मणी गुलाबी दिसतात. एकाच द्राक्षघडामधील मण्याच्या रंगामध्ये फरक पडतो. द्राक्षे खाण्याच्या दृष्टीने सर्वसामान्य ग्राहक एक सारख्या (हिरवा, लाल किंवा काळा) रंगाला प्राधान्य देतो.<br>यावर आजपर्यंत कोणताही उपाय उपलब्ध किंवा कार्य करत असल्याचे दिसत नाही किंवा कोणत्याही रसायनाने गुलाबी रंगाचा मणी हिरवा झाल्याचे पाहण्यात आलेले नाही. मात्र किमान व कमाल तापमानातील दरी कमी करण्यासाठी पाणी उतरण्याच्या आठ ते दहा दिवसांआधी किंवा किमान ७ ते ८ अंश सेल्सिअस येण्यापूर्वी प्रत्येक द्राक्षघड पेपरने झाकल्यास काही प्रमाणात फायदा होऊ शकतो. पेपरने घड झाकण्यापूर्वी भुरी आणि मिलीबग नियंत्रणासाठी शिफारशीप्रमाणे बुरशीनाशक आणि कीडनाशकांची फवारणी करून घ्यावी.<br>द्राक्ष बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षणकरावे.<br>थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे. |
| **डाळिंब** | | <u>मृग बहार (बागेची अवस्था- विश्रांती)</u><br><u>मशागत</u><br>मृग बहारातील फळे तोडणी संपल्यावर लगेच पेन्सिल आकाराच्या फांद्या शेंड्याकडून ६० सें.मी. पर्यंत कापून खरड छाटणी करावी.<br>तुटलेल्या, गुंतलेल्या आणि रोगग्रस्त फांद्या काढाव्यात. सरळ आणि झाडाच्या मधोमध वाढलेले पानसोट काढावेत, जेणेकरून सूर्यप्रकाश संपूर्ण झाडावर पडेल आणि हवा खेळती राहील.<br>छाटणी केलेल्या झाडांवर त्याच दिवशी १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी.<br>विश्रांती कालावधी किमान दोन ते तीन आठवड्यांचा असावा.<br>हवामान व जमिनीच्या प्रकारानुसार आठवड्यातून एक ते दोन दिवसांनी हलके पाणी (१५ ते २० लिटर प्रतिझाड) द्यावे. सिंचनाचे प्रमाण जमिनीत दिलेली पोषणद्रव्ये शोषून घेण्यासाठी पुरेसे असावे.<br>डाळिंब बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षणकरावे.<br>थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे. |
| **आंबा** | | <u>आंबा मोहर व्यवस्थापन</u><br>आंबा मोहराचे संरक्षण करण्यासाठी डिसेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्होस॰ २० मिली, बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी प्रोपीकोनॅझोल १० मिली तसेच कोळी नियंत्रणासाठी डायकोफॉल॰२० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>पीक संरक्षण<br>पालवी अवस्थेतील आंब्यावर तुडतुड्यांच्या प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. किडीच्या प्रादुर्भावासाठी कोवळ्या पालवीचे निरीक्षण करावे. प्रादुर्भाव दिसून आल्यास, डेल्टामेथ्रीन (२.८ ईसी) ०.९ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर तसेच खोडावर फवारणी करावी.<br>बोंगे फुटण्याच्या अवस्थेत असलेल्या आंब्यावर तुडतुडे व भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी, लॅमडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ०.६ मि.ली. अधिक हेक्झाकोनॅझोल (५ ईसी) ०.५ मि.ली. किंवा विद्राव्य गंधक (८० डब्ल्यूपी) २ ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारावे.<br>पालवी आणि मोहोर अवस्थेतील आंबा बागेमध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. आंब्याचा मोहोर करपा रोगाच्या प्रादुर्भावामुळे करपला असल्यास दुपारी कडक उन्हामध्ये झाडावरील मोहोर झाडून घ्यावा. नियंत्रणासाठी, अॅझॉक्सिस्ट्रोबीन (२३ एससी) ०.६ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **कांदा** | | रबी हंगामातील कांदा पिकाची पुनर्लागवड १५ x १० सें.मी. अंतरावर करावी.<br>कांदा पुनर्लागवड सपाट वाफ्यात करावी.<br>कांदा पिकास नत्र खताची मात्रा द्यावी. |
| **टोमॅटो** | | तण नियंत्रण<br>टोमॅटो पुनर्लागवडीनंतर आवश्यकतेनुसार खुरपण्या करून पीक तणविरहित ठेवावे. टोमॅटोच्या पिकात तणनाशकाचा वापर करावयाचा झाल्यास, रोपांच्या पुनर्लागवडीपूर्वी कोरड्या वाफ्यात पेंडिमिथॅलिन (३० ईसी) १ लिटर प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीनंतर पाणी देऊन पुनर्लागवड करावी. अन्यथा पुनर्लागवडीनंतर १६ ते २० दिवसांनी मेट्रीब्यूझीन (७० डब्ल्यूपी) या तणनाशकाची ३०० ग्रॅम प्रति एकर या प्रमाणात नॅपसॅक पंपाने फ्लॅट फॅन किंवा फ्लड जेट नोझल वापरून तणांवर फवारणी करावी. फवारणीवेळी जमिनीत पुरेसा ओलावा असावा. |
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | जनावराना रात्री गोठ्यात ठेवावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा कोरडा ठेवावा. लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे सध्याच्या थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान / शेडनेटचे पडदे लावावेत. तसेच गोठय़ामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोटय़ा जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषत: गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. |
| **शेळी - मेंढी** | | शेळ्या,मेंढ्यांचा गोठा<br>गोठ्याची रचना ही इंग्रजी ‘A’ अक्षराप्रमाणे असावी. शेळ्या-मेंढ्यांना फार खर्चिक गोठ्याची आवश्यकता नसते. गोठे थोड्या उंचावर बांधणे आवश्यक असते. गोठे कोरडे, हवेशीर आणि सुयोग्य असावेत.<br>हिवाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण कमी असल्यामुळे गोठ्यामध्ये ओलावा जास्त वेळ टिकून राहतो आणि तापमान कमी होते. गोठ्याची दिशा ठरवताना पूर्व-पश्चिम बाजूने ठेवल्यास सकाळी आणि सायंकाळी कोवळ्या सूर्यकिरणांमुळे गोठ्यातील ओलसरपणा कमी होतो. उपलब्ध होणाऱ्या वैशिष्ठ्यपूर्ण सूर्यकिरणामुळे जंतुनाशक प्रक्रिया होऊन गोठे निर्जंतुक होण्यास मदत होते. |
| **कुक्कुटपालन** | | हिवाळ्यात कोंबड्यांचे व्यवस्थापन<br>कोंबड्यांची प्रत्येक हंगामामध्ये विशेष काळजी घेऊन व्यवस्थापनामध्ये योग्य बदल करावा लागतो. आपल्याकडे ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यांत तापमान कमी असते. हिवाळ्यात कोंबड्यांची थंडीच्या कडाक्याने (कोल्ड स्ट्रोक) मरतूक होते. जर १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी आणि २८ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त तापमान असेल तर कोंबड्यांवर परिणाम होतो.<br>कोंबड्याच्या वाढीसाठी १८ ते २१ अंश सेल्सिअस तापमान चांगले असते. परंतु थंडीमध्ये काही भागातील तापमान २१ अंश सेल्सिअसपेक्षा खूप कमी होते, अशावेळी कोंबड्यांना शरीर तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी जादा ऊर्जेची गरज असते. हिवाळ्यामध्ये जर तापमान खूपच कमी झाले तर कोंबड्या थंडीच्या कडाक्याने मृत्यूमुखी पडतात. त्यामुळे हिवाळ्यात कोंबड्यांची काळजी घ्यावी लागते. |

**स्त्रोत**:

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**

**ठिकाण** : विकृसंके,इगतपुरी

**दिनांक** : १२. १२.२०२५